# मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उस्मानाबाद यांचे कार्यालय, उस्मानाबाद – 413 501.

दूरध्वनी क्रमांक 02472 224733

क्रं./रोविले/ 2306 /2025 दिनांक : 15 मार्च, 2025

## संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती बाबत
## निविदा सूचना

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद हे उस्मानाबाद जिल्हा न्यायालय तसेच जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेखालील इतर सर्व न्यायालयातील (उस्मानाबाद, उमरगा, तुळजापूर, लोहारा, कळंब, वाशी, भूम आणि परंडा) संगणक यंत्रसामुग्रीच्या वार्षिक देखभाल/दुरूस्ती बाबतचे करारासाठी मुळ **किंमतीच्या 3 टक्के** दरापर्यंत कमीत कमी रकमेच्या मोहोरबंद निविदा मागवित आहोत. सर्वात कमी रकमेची निविदा (L1) विचारात घेण्यात येईल.

### District and Subordinate Courts of Osmanabad Judicial District
### Number of Hardware and price.

| Sr. No. | Hardware Description | Qty. | Price |
|---|---|---|---|
| 1 | Hp Laserjet Pro M202dw | 20 | 170408 |
| 2 | Samsung M3320ND | 16 | 167840 |
| 3 | Canon lbp 151DW Duplex Laser Network Printer | 44 | 481096 |
| 4 | Canon lbp 151DW Duplex Mono Laser Printer | 29 | 311663 |
| 5 | Canon Monochrome lbp 151DW Duplex Laser Network Printer | 5 | 44000 |
| 6 | Laser Printer Brother L2541 DW (AIO) | 9 | 235936 |
| 7 | Laser Printer Brother B2080DW | 5 | 76877 |
| 8 | Networking Switches | 9 | 64684 |
| | | **Total** | **1552504** |

**AMC Location:** 1) Osmanabad 2) Omerga, 3) Tuljapur, 4)Lohara, 5) Kallam, 6) Washi, 7) Bhoom and 8) Paranda.

### संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती बाबतच्या शर्ती व अटी.

| कामाचे नांव | संगणक यंत्रसामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती करार. |
|---|---|
| कराराचा कालावधी | 1. निविदा मंजूर झाल्यानंतर करार झाल्याच्या **दिनांकापासून ते 31 मार्च, 2026** पर्यंत राहील.<br>2. खालील नमूद अटी व शर्ती पूर्ण करणा–या व्यवसायिक / कंपनी यांनी आपल्या मोहर बंद निविदा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, उस्मानाबाद या पत्यावर सादर कराव्यात.<br>3. मोहोरबंद निविदा हया **दिनांक 24 मार्च, 2025** पर्यंत सायंकाळी **5.00** वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारल्या जातील. सायंकाळी 5.00 वा.नंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.<br>4. लिफाफयावर **"संगणक यंत्र सामुग्री देखभाल दुरूस्ती करिता निविदा"** असे नमूद करावे. |
| तांत्रिक अटी व शर्ती | **व्यवसायिक / कंपनी यांनी खालील कागदपत्र निविदेसोबत जोडावे.**<br>1. व्यवसायिक / कंपनी यांना संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती बाबत कामाचा कमीत कमी 3 तीन वर्ष अनुभवाचे प्रमाणपत्र.<br>2. व्यवसायिक / कंपनी पंजीकृत / परवाना प्राप्त असल्याचे शॉप ॲक्ट नुसार परवान्याची छायांकित प्रत.<br>3. निविदा मंजूरीनंतर 10 दहा दिवसाचे आत सुरक्षा निधी जिल्हा न्यायालयात जमा करावा.<br>4. निविदा मंजूरीनंतर सुरक्षानिधी जमा केली गेली नसल्यास निविदा कोणतेही कारण न देता नामंजूर करण्यात येईल व त्यासंबंधी कोणतेही सबबी किंवा कारण ऐकून घेतले जाणार नाही, व्यावसायिक / कंपनी यांनी सुरक्षा निधी निविदा मंजूर झालेनंतर जमा करणे बंधनकारक आहे.<br>5. तसेच ज्या व्यावसायिक / कंपनी ची निविदा मंजूर करण्यात येईल त्या व्यावसायिक / कंपनीने संगणक यंत्रसामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती करार करण्यास नकार दिल्यास सदर व्यावसायिक /कंपनीचा सुरक्षा निधी जप्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| 1 | मोहोरबंद निविदा हया प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांचे नावाने वरील दर्शविलेल्या पत्यावर **दिनांक दिनांक 24 मार्च, 2025 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत** या कार्यालयात स्विकारल्या जातील. सायंकाळी 5.00 वा. नंतर आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. |
| 2 | सदरहू निविदा सुचनेत नमूद संगणक यंत्र सामुग्री कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी राखून ठेवलेले आहेत. |
| 3 | कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नाकारण्याचा अधिकार प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे. |
| 4 | सदरहू करार हा निविदा मंजूर झाल्यानंतर करार झाल्याच्या **दिनांकापासून ते 31 मार्च, 2026** पर्यंत वैध राहील. |
| 5 | संगणक यंत्र सामुग्री वार्षिक देखभाल / दुरूस्ती करार उस्मानाबाद आणि उमरगा, तुळजापूर, लोहारा, कळंब, वाशी, भूम आणि परंडा येथील न्यायालयात स्थापित केलेल्या संगणक यंत्रसामुग्री करिता राहील. |
| 6 | व्यवसायिक / कंपनी / अभियंत्याकडे यंत्रसामुग्री दुरूस्ती बाबत तकार दिली असता त्यांना **सदरहू तकार 24 तासाचे आत हजर राहून दुरूस्ती करून दयावी लागेल** व तालुक्याच्या ठिकाणी 72 तासाच्या आत दुरूस्ती करून दयावी लागेल. तसेच दुरुस्ती कामी लागणारे सुटे भागाचा खर्च ही वार्षीक देखभालीच्या करारामध्ये मंजूर झालेल्या रकमेध्ये अंतर्भूत असेल याची नोंद घ्यावी. तसेच तकार दिल्यापासून 24 तासाचे आत सदर तकारीचे निवारण न केल्यास त्यानंतर प्रत्येक दिवसाला रूपये 300/– प्रमाणे दंड आकारण्यात येईल. |
| 7 | दूरध्वनीव्दारे यंत्रसामुग्री दुरूस्ती संदर्भात तकार दिल्यास त्यांना त्यांची नोंद घ्यावी लागेल व ती त्यांना स्विकारावी लागेल. तसेच नोंदवही ठेवण` आवश्यक आहे. सर्व न्यायालयाचे ठिकाणी व्यवसायिक/कंपनी यांना स्वखर्चाने जावे लागेल. |
| 8 | उपरोक्त सर्व नमूद यंत्र सामुग्री दुरूस्ती मध्ये सुटे भाग दुरूस्ती करिता नेल्यास त्याची नोंदवहीत नोंद घ्यावी, दोन दिवसाचे आत सदरहू सुटे भाग दुरूस्त करून जोडणी करून दयावी लागेल. दुरूस्तीला विलंब लागत असल्यास त्या ठिकाणी पर्यायी संगणक यंत्रसामुग्री उपलब्ध करून दयावी लागेल. |
| 10 | निविदा मंजूर झालेल्या कंपनीला 100/– रूपयाचे बॉन्ड पेपरवर निविदेत नमूद अटी व शर्ती बाबत करार करून दयावा लागेल सदरहू 100/– रूपयाचा स्टॅपपेपरचा खर्च कंपनीला सोसावा लागेल. |
| 11 | वर्षिक देखभाल / दुरूस्ती करारावर राज्य व केंद्र सरकारचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे कर निविदा मंजूर झालेल्या कंपनीला सोसावे लागेल. |
| 12 | संगणक उपकरणांची व्यापक (comprehensive) देखभाल / दुरूस्ती राहील. |
| 13 | Laser Printers, LAN Switch यांचे सर्व सुटे भाग व Laser Printers Fuser Assembly दुरूस्ती अथवा बदलून देणे देखभाल / दुरूस्ती वेळेत करून देणे हे करारामध्ये राहील. सुटे भाग हे स्टॅडर्ड कंपनीचेच असावे. लॅन मध्ये काही तांत्रीक बिघाड झाल्यास, **लॅन कनेक्टीव्हीटी बंद पडल्यास सदरील ठिकाणी 24 तासाच्या आत जावून सेवा देणे बंधनकारक राहील.** |
| 14 | देयक हे त्रैमासिक पध्दतीने त्रैमासिक संपल्यानंतर देयक सादर केल्यावर नियमानुसार अदा करण्यात येईल. देयक हे व्दिप्रतीत संपूर्ण तपशिलासह या कार्यालयास सादर करावे लागेल. |
| 15 | राज्य व केंद्र सरकारचे सर्व कर वगळून देयक अदा करण्यात येईल. रक्कम ही ईएफटी व्दारे अदा करण्यात येईल. |
| 16 | उस्मानाबाद न्यायीक जिल्हयाअंतर्गत सर्व न्यायालयातील स्थापित असलेली संगणक यंत्रसामुग्री मधील कांही संगणक यंत्र सामुग्री इतर ठिकाणचे न्यायालयात स्थापीत केल्यास त्यांची दुरूस्ती सुध्दा कंपनीला त्या ठिकाणी जावून करावी लागेल. |
| 17 | करारानुसार व अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षीक देखभाल / दुरूस्ती करार संपूर्णतः रदद करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, उस्मानाबाद यांना राहतील. |

दिनांक : 15 मार्च, 2025
जिल्हा व सत्र न्यायालय,
**उस्मानाबाद.**

COURT OF SESSIONS OSMANABAD

Bchar 15/3/2025

**जिल्हा प्रकल्प समन्वयक,**
**उस्मानाबाद.**

**याची एक प्रत –**

1. सदरील निविदा सुचना ही https://osmanabad.dcourts.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिध्द केली आहे
2. जिल्हा न्यायालय / दिवाणी न्यायालय व.स्तर, मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय, उस्मानाबाद व सर्व तालुका न्यायालये यांचे नोटीस बोर्डवर डकविण्याकरीता.
3. जिल्हाधिकारी कार्यालय, **धाराशिव** यांचे नोटीस बोर्डवर डकविण्याकरीता.